# वृत्त प्रकाशन
## मुंबई दिनांक १५ फेब्रुवारी, २०२१

एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाचा ७० वा दीक्षांत समारोह दिनांक १७ फेब्रुवारी, २०२१ रोजी सकाळी १०.३० वाजता सर सीताराम आणि लेडी शांताबाई पाटकर दीक्षांत सभागृह, चर्चगेट येथे साजरा होणार आहे. करोना साथीच्या पार्श्वभूमीवर आणि सामाजिक अंतराच्या नियमानुसार फक्त पारितोषिक विजेत्या विद्यार्थीनींची उपस्थीती अपेक्षीत आहे. इतर विद्यार्थीनी हा समारोह www.estv.in/sndt या लींकवर थेट प्रक्षेपण पाहू शकतील.

या दीक्षांत समारोहात एकूण १६४८५ पदवीधर विद्यार्थीनींना पदवी / पदवीका प्रदान करण्यात येतील. यात स्नातक (बॅचलर डिग्री) पदवीचे (१३७७८) प्रमाण सर्वाधिक असून, स्नातकोत्तर (२०७५), स्नातकोत्तर पदविका (१९९) पदविका प्रमाणपत्र (४०४) आणि २९ पीएच.डी. च्या विद्यार्थीनी आहेत. एकूण १२० विद्यार्थीनींना मिळून ७३ सुवर्णपदक, २१८ रौप्यपदके व २१८ बक्षिसे देण्यात येतील. यात १०५ पदवी आणि पदविका चार विद्याशाखांच्या अंतर्गत (विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन, मानविकी आणि अंत:विषय अभ्यासक्रम) प्रदान करण्यात येतील.

हे विद्यापीठ बहूभाषिक पार्श्वभूमी असलेल्या विद्यार्थीनींना शिकवते आणि या समारोहात ११५४५ इंग्रजी माध्यमातील, ३६०३ मराठी माध्यमातील, ७९४ हिंदी माध्यमातील, ५०० गुजराती माध्यमातील व ४३ उर्दू माध्यमातील विद्यार्थीनी पदवी स्विकारतील.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल व विद्यापीठाचे कुलपती श्री भगतसिंह कोश्यारी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील. समारोहाचे प्रमुख अतिथी श्री मुकुल कानीटकर दीक्षांत भाषण करतील. विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. शशीकला वंजारी अभ्यागतांचे स्वागत करून दीक्षांत अहवाल सादर करतील. विद्यापीठाला मिळालेल्या एकूण रूपये २७,३६,७९९ निधी पैकी रूपये १५,३९,००० भाऊबीज निधीतून, रूपये ७,९७,७९९ संस्थागत व रूपये ४,००,००० वैयक्तीक देणगीतून प्राप्त झाले आहेत.